दै. प्रजावाणी दि. ०४/०३/२०२५

# आता नांदेड पोलिसांचे 'मिशन सहयोग' अभियान

## कम्युनिटी पोलिसिंगसाठी एसपी अबिनाश कुमार यांचा पुढाकार

नांदेड (प्रतिनिधी)- पोलीस प्रशासन आणि समाज यांचा घनिष्ट संबंध असतो. पोलिसांच्या कामकाज पद्धतीचा परिणाम समाजावर पडत असतो. पोलीस प्रशासन चोवीस तास समाजासाठी कार्यरत असतात. अशा वेळी दैनंदिन कामकाजा-शिवाय सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून या बाबतीत पोलीस प्रशासन युवक-युवती, महिला, वृद्ध यांना सोबत घेवून विधायक कार्य करणार आहेत. 'मिशन सहयोग' अंतर्गत ८ नाविन्यपूर्ण उपक्रमांची सुरूवात करण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील प्रत्येक गावाची सुरक्षा अबाधित ठेवण्यासाठी पोलीस पाटील व ग्रामसुरक्षा दल तसेच शहरातील मोहल्ला कमिटी यांच्यामध्ये संवाद योजना त्याच बरोबर पोलीस पाटील व ग्रामसुरक्षा दल यांच्यामध्ये क्रिकेट व व्हॉलीबॉल मॅचेसचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच पोलीस पाटील आणि ग्रामसुरक्षा दलांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात येणार आहे. यासोबतच बीट इन्चार्ज हे बीट स्तरावर जास्तीत जास्त पोलीस आणि जनतेचा सहभाग वाढवण्यावर भर देतील.

अ) रोजगार मेळावा-जिल्ह्यातील बेरोजगार युवक व युवतींना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी पोलीस दलाकडून प्रयत्न करून काही नामांकित कंपन्यांना निमंत्रण देवून रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात येणार आहे. ब) एम. पी. एस. सी. व यू.पी.एस.सी. मार्गदर्शन-मराठवाड्यातील युवक-युवतींचे एम.पी.एस.सी., यु.पी. एस.सी., पोलीस भर्ती तसेच इतर स्पर्धा परीक्षा यामध्ये प्रमाण वाढवण्यासाठी यशस्वी अधिकाऱ्यांच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात येणार आहे. क) आयडॉल भेट व मार्गदर्शन -शहरातील उपेक्षित, वंचित घटकातील व मोहल्यातील युवकांमध्ये करिअर बाबतीत जागरूकता निर्माण करण्यासाठी प्रत्येक कॉलनी व मोहल्ला स्तरावर विविध कार्यक्रमांचे व आदर्श व्यक्तिमत्वांची (आयडॉल) भेट व त्यांच्या मार्गदर्शनाचे आयोजन करण्यात येणार आहे. अल्पवयीन आणि तरुण वर्गाने त्यांचा गुन्हेगारी जगतातील आदर्श




३०७/३०२ सारखे गुन्ह्यातील इसम आणि गुंड प्रवृत्ती असणाऱ्या व्यक्तींचा आदर्श न ठेवता आपल्या आयुष्यात स्वकष्टाने यशस्वी होणाऱ्या व्यक्तींना आदर्श (आयडॉल) मानावे. जेणे करून अल्पवयीन गुन्हेगारीचे प्रमाण कमी होवून तरुण पिढी देखील गुन्हेगारी क्षेत्रात जाऊ नये. नांदेड जिल्ह्यातील नंदगिरी किल्ला, कंधार किल्ला, येरगी, होट्टल या सारख्या प्राचीन ऐतिहासिक वास्तुंचे जतन व संवर्धन करण्यासाठी पोलीस दल प्रयत्नशील राहणार आहे. त्यात समाजातील युवक-युवती तसेच अनेक संस्थांचा सहभाग घेतला जाईल. ज्यामुळे तरुण युवक-युवती सकारात्मक दिशेने जास्तीत जास्त सहभागी व व्यस्त राहतील आणि - वाढतील.

नांदेड पोलीस लीग -नांदेड पोलीस दलाच्यावतीने ग्रामीण भागातील युवकांना संधी उपलब्ध करून देण्यासाठी क्रिकेट, कबड्डी स्पर्धेचे आयोजन तीन स्तरावर १. पोलीस स्टेशन स्तरावर, त्यानंतर २. उपविभागीय कार्यालय स्तरावर आणि शेवटी ३. पोलीस अधीक्षक कार्यालय स्तरावर अशा स्वरूपात करण्यात येवून विजेत्यांचा योग्य सन्मान करण्यात येईल. त्यामुळे युवकांच्या उत्साहाला चालना मिळू शकते.

मिशन निर्भया समाजात महिलांनी निर्भीडपणे वावरण्यासाठी निर्भया रॅलीचे आयोजन करण्यात येईल यामध्ये युवती व स्त्रियांचा समावेश असेल त्यानंतर परिसंवाद असेल. तसेच महिला सुरक्षीततेसाठी दामिनी पथक, स्ट्रीट सेफ्टी ड्राईव्ह पथक याव्दारे नियमीत ड्राईव्ह घेणे.

मिशन समाधान* समाजातील जनतेमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण होण्यासाठी आणि जलद तक्रार निवारणसाठी कोड आधारित आणि तक्रार निवारण यंत्रणा राबविण्यात येणार आहे. मिशन निर्धार सराईत गुन्हेगार व रेकॉर्डवरील आरोपी यांना व्यसनाधिनता व गुन्हेगारीपासून परावृत्त करणे आणि त्यांना आयुष्यात पुन्हा नव्याने सन्मानाने जगण्यासाठी स्वतःच्या पायावर उभे राहुन आत्मनिर्भर होण्यासाठी मिशन निर्धारचे आयोजन केले जाणारे आहे. यामध्ये - असे विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. मिशन एकता पोलीस दल व समाजातील विविध घटक जसे की पत्रकार, उद्योजक, वकील, डॉक्टर, व्यापारी, ऑटोरिक्षा संघटना, बिल्डर, हॉटेल व्यावसाईक, खाजगी शिकवणी (ट्युशन) क्लासेस यांच्यात समन्वय व एकता निर्माण होण्यासाठी क्रिकेट स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. याद्वारे असे विविध सामाजिक घटक व पोलीस दल यांच्यात समन्वय साधून ते आपल्या अडीअडचणी पोलीस दलासमोर मांडू शकतील या अनुषंगाने मिशन एकता राबवले जाणार आहे.